# प्रकरण ३ रे : पर्यटनाचे वर्गीकरण आणि पर्यटनातील अधूनिक कल
# (Classification and Recent Trends in Tourism)

**३.१ पर्यटनाचे वर्गीकरण:-**

१.राष्ट्रीयत्वानुसार
२.कालावधीनुसार
३.पर्यटकाच्या संख्येच्या आधारे
४. उद्देशानुसार
५.वाहतूक साधनाच्या आधारे
६.ऋतूनुसार
७.पर्यटनाच्या स्वरूपाच्या आधारे

**३.२ पर्यटनातील अधूनिक कल**

**प्रास्ताविक:-**

राष्ट्रीय अर्थव्यवस्थेमध्ये पर्यटनाचे महत्त्व वाढत आहे. पर्यटन हा व्यवसाय भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, ऐतिहासिक, धार्मिक घटकावर अवलंबून आहे. आज पर्यटन हा व्यवसाय झपाट्याने विकसित होत आहे. जगामध्ये जे पर्यटन केले जाते त्याचे वेगवेगळे उद्देश असतात त्यानुसार पर्यटनाचे वर्गीकरण केले जात आहे. त्याचबरोबर पर्यटन हा पारंपारिक व्यवसाय राहिलेला नसून त्यामध्ये काही आधुनिक पर्यटनाचा समावेश होत आहे. पर्यटकांना आकर्षित करून घेण्यासाठी काही साहसी, धाडसी पर्यटन संकल्पना उदयास येत आहेत या सर्वांची सविस्तर चर्चा या घटकांमध्ये केलेले आहे

**३.१ पर्यटनाचे वर्गीकरण (Classification of Tourism)**

पर्यटनाचे अनेक प्रकार वेगवेगळ्या आधारावर करता येतात. यामध्ये राष्ट्रीयतानुसार कालावधीनुसार, पर्यटकाच्या संख्येच्या आधारे, उद्देशानुसार किंवा हेतूनुसार, वाहतूक साधनाच्या आधारे, ऋतूनुसार आणि पर्यटनाच्या स्वरूपाच्या आधारे पर्यटनाचे वर्गीकरण केले जाते. याचे सविस्तर वर्णन पुढीलप्रमाणे करता येईल.

**१. राष्ट्रीयतानुसार किंवा प्रदेशानुसार पर्यटनाचे वर्गीकरण**(Classification on the basis of Nationality)

पर्यटकाची राष्ट्रीयता लक्षात घेता पर्यटनाचे दोन प्रकार पडतात

**I.देशांतर्गत किंवा स्वदेशी किंवा देशी पर्यटन** (Internal or Domestic Tourism)

देशातल्या देशात केले जाणारे पर्यटन म्हणजे देशांतर्गत पर्यटन म्हणून ओळखले जाते. लोकांना देशांतर्गत पर्यंत प्रवास सहज सोपे वाटतात कारण भाषा, विनिमय आणि कागदपत्रे यांचा अडथळा नसतो. त्यामुळेच परदेशी पर्यटन पेक्षा देशी पर्यटकांची संख्या जास्त असते. त्याचबरोबर यामध्ये प्रवासाच्या विविध साधनांची उपलब्धता असते.

**II.आंतरराष्ट्रीय किंवा परदेशी किंवा विदेशी पर्यटन** (International Tourism)

एका देशातून दुसऱ्या देशात होणाऱ्या पर्यटनास आंतरराष्ट्रीय किंवा परदेशी पर्यटन असे म्हणतात. अशा पर्यटनात व्हिसा व इतर कागदपत्राची पूर्तता करावी लागते. त्यामुळे हे पर्यटन इतर पर्यटनापेक्षा अधिक पूर्वतयारीचे असते. ज्या देशात प्रवास करावयाचा त्याचे चलन घ्यावे लागते. वैद्यकीय प्रमाणपत्राची पूर्तता करावी लागते. राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत या पर्यटनाकडे अधिक गंभीरपणे पाहिले जाते. या पर्यटनाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असतो. अलीकडच्या काही दशकात हवाई वाहतुकीत झालेल्या क्रांतिकारक बदलामुळे या प्रकारातील पर्यटनात मोठा बदल व प्रगती झालेली आहे.

**२. कालावधीनुसार पर्यटनाचे वर्गीकरण** (Classification on the basis of Time)

या पर्यटनात प्रवासाचा कालावधी, मुक्कामाचा कालावधी, याचा विचार करून खालील प्रकार पडतात.

**I.अल्पकालीन पर्यटन** (Short Term Tourism)

पर्यटक जेव्हा मर्यादित हेतूने अगदी थोड्या प्रदेशाच्या पर्यटनासाठी बाहेर पडतो त्यास अल्पकालीन पर्यटन असे म्हणतात. यामध्ये एखाद्या यात्रेच्या निमित्ताने, धार्मिक विधीसाठी, शैक्षणिक प्रकल्पासाठी, आठवडा सुट्टीतील पर्यटन या प्रकारात मोडतो. या पर्यटनाचा कालावधी एक ते दहा दिवस इतका असतो.

**II.दीर्घकालीन पर्यटन** (Long Term Tourism)

जेव्हा पर्यटक प्रदीर्घ काळासाठी मोठ्या उद्देशाने आणि अमर्याद प्रदेशांत पर्यटन करण्यास बाहेर पडतो त्यास दीर्घकालीन पर्यटन असे म्हणतात. या प्रकारचे पर्यटन साधारणता काही आठवडे ते काही महिने अशा कालखंडाचे असू शकते. उदा. एखाद्या धार्मिक पर्यटनामध्ये चारीधाम यात्रा, संपूर्ण देश पर्यटन,

प्रधीर्ग काळ चालणारी संशोधन मोहीम, गिर्यारोहन इत्यादी पर्यटनाचा यात समावेश होतो. पर्यटकाने या प्रदीर्घ काळ चालणाऱ्या पर्यटनाची मानसिक, आर्थिक तयारी केलेली असते.

**३.पर्यटकाच्या संख्येनुसार पर्यटनाचे प्रकार** (Classification on the basis of Number of tourist)

प्रवासात बरोबर असलेल्या सहकार्याच्या संख्येनुसार पर्यटनाचे व्यक्तिगत आणि समूह पर्यटन असे दोन प्रकार पडतात.

**I.व्यक्तिगत पर्यटन** (Individual Tourism)

व्यक्तिगत पर्यटन म्हणजे एक व्यक्ती किंवा पर्यटकाचे कुटुंब त्यांनी निश्चित केलेल्या ठिकाणी जातात, त्यांचा कार्यक्रम ते स्वतः आखतात, त्यात ते त्यांच्या इच्छेनुसार हवा तो बदल करतात त्यास व्यक्तिगत पर्यटन असे म्हणतात. या प्रकारात पर्यटक किंवा पर्यटकाचे कुटुंब प्रवासाचा मार्ग आखतात आणि मुक्कामाचे ठिकाण सुद्धा निश्चित करतात अशा पर्यटनात प्रवास, निवास व्यवस्था आणि इतर गोष्टी पर्यटक स्वतः ठरवतो.

**II.समूह किंवा गट किंवा सामूहिक पर्यटन** (Group Tourism)

जेव्हा संपूर्ण कुटुंब किंवा अनेक लोकांचा समूह एकत्र येऊन एखादे पर्यटन करतात त्यास समूह किंवा गट किंवा सामूहिक पर्यटन असे म्हणतात. या प्रकारच्या पर्यटनामध्ये संपूर्ण कुटुंब, कौटुंबिक सहल काढते किंवा गावातील एखादा गट, प्रवासी कंपनीकडे नोंदवलेला गट, असे या प्रकारच्या पर्यटनात सहभागी होतात. या सहली साठी पर्यटन स्थळे, मुक्कामाची ठिकाणे, प्रवासाची साधने ,याबाबतीत आयोजकांनी अगोदरच व्यवस्था केलेली असल्याने पर्यटकास कोणतेच स्वातंत्र्य नसते. पर्यटकास स्वतः काहीही करावे लागत नाही. या पर्यटनात सर्व सेवा, भोजन, निवास, मनोरंजन इत्यादी आयोजकांकडून पुरवले जाते.

**४. पर्यटकाच्या उद्देशानुसार किंवा हेतूनुसार पर्यटनाचे प्रकार** (Classification on the basis of Objectives)

पर्यटन करण्यासाठी व्यक्तीच्या मनामध्ये कोणता तर उद्देश किंवा हेतू असतो त्या उद्देशानुसार किंवा हेतूनुसार पर्यटनाचे प्रकार खालील प्रमाणे करता येतील.

**I.सुट्टीचे पर्यटन** (Holiday Tourism)

सुट्टीची संकल्पना युरोपमध्ये उदयास आली. दळणवळणाच्या आधुनिक साधनामुळे सुट्टीतील पर्यटनाला अधिक चालना मिळालेले आहे. या पर्यटनामध्ये सुट्टीतील दिवस घरापासून दूर निसर्गाच्या

सानिध्यात तळी, तलावाच्या परिसरात, समुद्रकिनाऱ्यावर व्यतीत करणे हा मुख्य उद्देश असतो. बहुतांश वेळा सुट्टीतील पर्यटन आपल्या कुटुंबाचा, मित्राचा किंवा सहकार्याच्या संगतीत अशा सहलीचे आयोजन केले जाते.

**II.धार्मिक (तिर्थाटन) पर्यटन** (Religious Tourism)

प्राचीन काळापासून सुख व समृद्धी प्राप्तीसाठी मनुष्यात धार्मिक वृत्ती निर्माण झालेली आहे. प्रत्येक धर्मातील लोक तीर्थाटनास जाऊ लागले. धार्मिक वृत्तीचे साधू, महंत, श्रध्दाळू , भक्तगण, यात्रा , उरूस इत्यादी ठिकाणी व्यक्तिगत अथवा समूहाने जातात. भारतामध्ये असंख्य तीर्थटन पर्यटन स्थळे असून विविध सण, समारंभ, उत्सव, यात्रा, वारी इत्यादीसाठी मोठ्या संख्येने पर्यटक किंवा भाविक तीर्थाटन करणास जात असतात. पाश्चिमात्य देशात असे पर्यटन मर्यादित असले. भारतासारख्या देशात दरवर्षी कोट्यावधी लोक असे पर्यटन करतात. महाराष्ट्रातील पंढरपूर ,कोल्हापूर, तुळजापूर, शिर्डी, शेगाव, नाशिक इत्यादी ठिकाणी सतत भरणाऱ्या यात्रेत लाखो पर्यटक येतात.

**III.मित्र व नातेवाईकाच्या भेटी दरम्यानचे पर्यटन**

काहीवेळा पर्यटनाचा हेतू मित्र व नातेवाईक यांच्या भेटीगाठी असा असतो. यामध्ये देशी-विदेशी या दोन्ही पर्यटन प्रकाराचा समावेश होतो. मोठ्या नगरात, अन्य प्रांतात किंवा परदेशात असलेल्या नातेवाईकांना भेटण्याच्या निमित्ताने तेथील प्रेक्षणीय स्थळे पाहण्याच्या उद्देश या प्रकारात असतो. पर्यटक शक्यतो आपल्या नातेवाईकाकडे मुक्काम करतात त्यामुळे खर्चही कमी येतो. उदा. लंडनला असलेल्या नातेवाईकाकडे गेलेले पर्यटक इंग्लड , युरोपीय देश व व शक्य झाल्यास अमेरिकेला ही भेट देऊन येतात.

**IV. अभ्यास पर्यटन** (Study Tourism)

या पर्यटनात पर्यटक निरनिराळ्या देशात शिक्षणाच्या निमित्ताने जातात आणि तेथील पर्यटन स्थळे पाहतात अर्थात या पर्यटनात मनोरंजनाला फारसा वाव नसतो. या पर्यटनात पर्यटक शैक्षणिक, संशोधन संस्था, संग्रहालय, चित्रप्रदर्शने, यांना जरुर भेटी देतात.

**V.मौजमजा किंवा मनोरंजन पर्यटन**

मनोरंजन व करमणूक हा पर्यटनाचा मुख्य उद्देश असतो. सातत्याने दैनंदिन कामामुळे त्याच त्याच प्रकारच्या जीवनशैलीला कंटाळा आलेला असतो. जे लोक सततच्या उद्योगात, व्यवसायात, नोकरीत गुंतलेले असतात ते कामाच्या सततच्या व्यापामुळे कंठाळले जातात हा कंटाळा घालविण्यासाठी हे लोक लहान

लहान सहली काढतात. सुट्टीचा आनंद उपभोगून पुन्हा नव्या जोमाने कामाला लागतात. या सहली आठवडाअखेर, सलग सुट्टीच्या वेळी काढल्या जातात.

**VI.धाडसी व साहसी पर्यटन**

पर्यटनाचा हा हेतू मर्यादित पर्यटका पुरता असतो. काही हौशी, साहसी पर्यटक जंगल विहार, जलविहार, समुद्रपर्यटन, गिर्यारोहन, पर्वत पर्यटन अशा प्रकारच्या सफरी काढतात. हे पर्यटन करणाऱ्या पर्यटनामध्ये तरुण पर्यटकांचा समावेश अधिक असतो. अलीकडच्या काळात या पर्यटनाला अधिक चालना मिळत असल्याचे दिसत आहे. परंतु हा प्रकार अधिक खर्चिक स्वरूपाचा आहे.

**VII.शैक्षणिक पर्यटन** (Educational Tourism)

शैक्षणिक हेतूने केले जाणारे पर्यटन आज प्रचंड प्रमाणात वाढत आहे. शिक्षणामध्ये सहभागी झालेले विद्यार्थी वेगवेगळ्या प्रदेशाच्या निरीक्षणासाठी, अभ्यास सहली व प्रकल्प तयार करण्याच्या निमित्ताने, शैक्षणिक पर्यटनामध्ये सहभागी होतात. बऱ्याच वेळा संपूर्ण देशभरात प्रवास अथवा काही वेळा परदेशी पर्यटनाची ही संधी घेतात

**VIII.आरोग्य पर्यटन** (Medical Tourism)

आरोग्य पर्यटन हा पर्यटनाचा नवीन प्रकार अलीकडच्या काही दशकात विकसित झालेला आहे. या पर्यटनामध्ये पर्यटकांचा मुख्य उद्देश विविध रोगावर उपचार करणे हाच असतो. झय रोगासाठी डोंगर माथ्यावरील शांत थंड-स्वच्छ हवा गुणकारी असते. झरा तील गरम पाण्याने स्नान केल्यास त्वचारोग बरे होतात. त्यामुळेच अशा पर्यटनस्थळी पर्यटकांची गर्दी वाढलेली दिसून येते. उदा. माथेरान, उरळीकांचन, इगतपुरी इत्यादी

**IX.पुराण वस्तू व ऐतिहासिक पर्यटन**

यामध्ये पर्यटकांचा मुख्य उद्देश प्राचीन वस्तू व ऐतिहासिक घटनांची माहिती घेणे हा असतो. यामध्ये गड-किल्ले, राजधान्या, पुराण वस्तू, संग्रहालय इत्यादी स्थळांना पर्यटक भेटी देतात. त्या पर्यटन ठिकाणाजवळ जिवंत इतिहास अनुभवण्याचा प्रयत्न करतात.

**X.कृषी पर्यटन** (Agro Tourism)

कृषी पर्यटन हा पर्यटनाचा नवीन प्रकार अलीकडच्या काळात उदयास येत आहे. कृषी जीवनाशी संबंधित सर्व घटकांची ओळख व्हावी या उद्देशाने हे पर्यटन केले जाते. उदा. सुगीच्या दिवसांमध्ये मका,

ज्वारी, हरभरा इत्यादी संबंधी हुरडा पार्टी इत्यादी स्वरूपात त्याचे आयोजन केले जात आहे. शेतकरी व शेती संबंधित घटकांची ओळख व आवड निर्माण व्हावी म्हणून कुटुंब एखाद्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये वास्तव्यास जाऊन शेतकरी जीवन पाहण्याचा प्रयत्न करतात. या पर्यटन प्रकाराची भविष्यकाळात फारच मागणी वाढेल असे अभ्यासकांना वाटते कारण जेवणाच्या जुन्या पद्धती या कृषी पर्यटन केंद्राचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

**XI.सांस्कृतिक पर्यटन** (Cultural Tourism)

विविध प्रदेशातील किंवा देशातील लोकांच्या चालीरीती, परंपरा, आचार, जीवन, आहार इत्यादी संस्कृती समजावून घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर शिल्पकला, कला, परंपरा, सण-उत्सव हे पाहण्यासाठी हजारो पर्यटक या ठिकाणी भेटी देतात.

**XII.निसर्ग पर्यटन** (Eco Tourism)

पारंपरिक पर्यटन केंद्रे प्रामुख्याने पर्यटकांच्या गर्दीने गजबजलेले आहेत, तेथे सर्वत्र गडबड-गोंधळ, वाहनांची प्रचंड गर्दी, प्रदूषण असते या सर्वांपासून सुटका होण्यासाठी निसर्ग पर्यटन ही मानवी हस्तक्षेपाशिवाय निसर्गाचे दृश्य पाहणे ही संकल्पना नवीन उदयास आलेली आहे. यामध्ये पर्यटकांचा मुख्य उद्देश जसा आहे तसा निसर्ग पाहणे असतो.

**५.वाहतूक साधनाच्या आधारे पर्यटनाचे प्रकार** (Classification on the basis of Transportation)

पर्यटन करण्यासाठी कोणकोणती प्रवासी साधने वापरली जातात यानुसार पर्यटनाचे खालील प्रकार पडतात.

**I.पायी पर्यटन** (Pedestrian Tourism)

वाहतुकीच्या साधनाचा फारसा प्रसार झालेला नव्हता तेव्हा पर्यटक शक्यतो पायीच प्रवासाला निघत. अशा वेळी तो बैल, घोडा, गाढव, उंट या प्राण्याचा वापर वाहतुकीसाठी करत करीत असे. हे जरी खरे असले तरी आजही अनेक पर्यटन प्रकारात पायी चालत जाणे पसंत केले जाते. अलीकडच्या काळात ट्रेकिंग पर्यटनाचा विकास होत आहे. ऐतिहासिक किल्ल्याच्या वरती, गड किंवा किल्ले भ्रमंती, डोंगर भ्रमंती सारखे उपक्रम राबवले जातात उदा.पन्हाळगड ते पावनखिंड ही पायी भ्रमंती, अनेक प्रकारच्या धार्मिक कारणासाठी देखील पायी भ्रमंती केली जाते.

**II.रस्ते मार्ग पर्यटन** (Road Tourism)

रस्त्यावरील विविध प्रकारच्या वाहनांना द्वारे केले जाणारे पर्यटन म्हणजे रस्ते पर्यटन होय. प्राचीन काळापासून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ये जा करण्याकरिता जमिनीवरील रस्त्यांचा वापर केला जात आहे. काळाच्या ओघात दळणवळणाच्या साधनांत क्रांती झाल्याने रस्ते मार्गावरील प्रवास अधिक सुखकर झाला आहे. अनेक समुद्र खड्यात डोंगरांमध्ये घाट रस्त्याचा विकास झाल्याने कोकण व घाटमाथा यांना जोडले गेल्याने रस्ते मार्गाने कोकणात पर्यटनासाठी येणाऱ्यांची संख्या वाढत प्रचंड आहे. भारतामध्ये चतुर कोण राष्ट्रीय महामार्ग झाल्याने दळणवळणाच्या क्षेत्रात क्रांतीच झालेली आहे.

**III.रेल्वेमार्ग पर्यटन** (Rail Tourism)

पर्यटनामध्ये अधिक सोयीस्कर व कमी खर्चातील पर्यटन म्हणून रेल्वे मार्गाचा विचार केला जातो. इंग्लंडमध्ये सन ३ मे 1860 रोजी पहिली रेल्वे सुरु झाली तेव्हापासून ते आजपर्यंत रेल्वे विस्तार व विकास थक्क करणारा आहे. काही देशांमध्ये स्वतः सरकारने व काही देशांमध्ये विविध कंपन्यांच्या माध्यमातून रेल्वेचा खूप मोठा विकास केलेला आहे. आज जगामध्ये तासी 380 किलोमीटर वेगाने धावणारी रेल्वे उपलब्ध आहे. तर भारतात राजधानी एक्सप्रेस सारखी 107 किलोमीटर वेगाने धावणारी रेल्वे आहे. त्यामुळे वेळेची बचत, आरामदायी प्रवास, इंधनाची बचत होऊ लागली आहे.

**IV.सागरी/ जलमार्ग पर्यटन** (Maritime Tourism)

प्राचीन काळापासून समुद्रामार्गे पर्यटन अथवा प्रवास चालू आहे. नवनवीन प्रदेशाचा शोध घेण्यासाठी अनेक मोठमोठ्या समुद्रसफारी यशस्वी झालेल्या आहेत. उदा. वास्को दि गामा, कोलंबस इत्यादी. आगबोटीचा शोध लागल्यानंतर सागरी पर्यटनाला एक वेगळे वळण मिळाले. सन 1669 मध्ये सुएज कालवा सुरू झाल्यानंतर पश्चिमी देश व पौर्वात्य देश यांच्यामधील अंतर फारच कमी झाले. सागरी पर्यटनासाठी अनेक देशांनी विविध उपक्रम ही राबवलेले दिसतात. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सागरी पर्यटनाचा विस्तार होत असून मौजमजा व मानसिक समाधानासाठी व शैक्षणिक अभ्यासासाठी सागरी पर्यटन केले जाते.

**V.हवाईमार्ग पर्यटन** (Air Tourism)

पर्यटन विकासात हवाई वाहतुकीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आंतरराष्ट्रीय व जास्त अंतरावरील प्रवासासाठी हवाई वाहतुकीचा सिंहाचा वाटा आहे. हवाई वाहतुकीला प्रचंड वेग असल्यामुळे वेळेची बचत होऊन जगातील दोन स्थळातील अंतर फार कमी झाले आहे. हवाई वाहतुकीमुळे समूह पर्यटन

अधिक विकसित झाले आहे. पर्यटकांना विविध विमान कंपन्या मधील अंतर्गत व्यापारी स्पर्धेमुळे अनेक सवलती मिळू लागल्या आहेत. सन 1952 नंतर हवाई वाहतुकीत बोईंग प्रकारच्या व्यापारी विमानाने क्रांती घडवून आणली व आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीत क्रांतिकारी बदल परिवर्तन घडून आले.

**VI.अवकाश मार्ग पर्यटन**

अवकाश यांनाद्वारे पर्यटनाची नवीनच संकल्पना पुढे आले आहे. अवकाश यानातून पृथ्वीचे विहंगम दृश्य पाहण्याचा खर्चिक पर्यटन अलीकडे श्रीमंत साठी उपलब्ध आहे. अलीकडच्या काळात ही एक नवीन पर्यटनाची संकल्पना आलेले आहे.

**६.ऋतूनुसार किंवा हंगामानुसार पर्यटनाचे प्रकार** (Classification on the basis of Season)

पर्यटन कोणत्या काळात केले जाते यावरून पर्यटनाचे खालील प्रकार पडतात

**I.उन्हाळी पर्यटन** (Summer Tourism)

ज्या प्रदेशांमध्ये अधिक उष्ण स्वरूपाचा उन्हाळा असतो. अशा प्रदेशातील किंवा देशातील व्यक्ती अथवा व्यक्तीसमूह ज्या भागात थंड हवेची ठिकाणे आहेत अशा भागात सहलीचे आयोजन करतात. युरोपीय देशांमध्ये मार्च ते जून अखेर असे उन्हाळयातील पर्यटनाचे आयोजन केले जाते.

**II.पावसाळी पर्यटन** (Rainy Season Tourism)

पर्यटनासाठी पावसाळी हंगाम जास्त उपयुक्त नसला तरी काही हौशी पर्यटक साहसी पर्यटक पावसाळी पर्यटन करतात. जास्त पावसाच्या ठिकाणी पडणारा पाऊस, धबधबे, पावसाळ्यातील धूके पाहण्यासाठी अशा ठिकाणी पर्यटनाचे आयोजन केले जाते. उदा. आंबोली, लोणावळा, खंडाळा, चेरापुंजी, महाबळेश्वर इत्यादी

**III.हिवाळी पर्यटन** (Winter Tourism)

साधारणता ज्या प्रदेशात सर्वाधिक थंडी असते किंवा तेथे हिवाळे बर्फाच्छादित असतात अशा प्रदेशात पर्यटक पर्यटनासाठी जातात. हिवाळा हा ऋतू पर्यटनासाठी अधिक चांगला समजला जातो. हिवाळ्यातील बर्फावर पर्यटन करण्यासाठी काही हौशी पर्यटक पर्यटनासाठी जातात. युरोपीय पर्यटक या काळात उन्हाचा आस्वाद घेण्यासाठी भारतात येतात. मुख्यता डिसेंबर ते मार्च या काळात हिवाळी पर्यटन आयोजित केले जाते.

**IV.सर्व हंगामी पर्यटन** (All Season Tourism)

वाहतुकीच्या अत्यंत वेगवान, सुरक्षित साधनाच्या उपलब्धतेमुळे, अलीकडे पर्यटनासाठी लोक बारमाही बाहेर पडतात. सर्वच हंगामामध्ये पर्यटनाचा व्यवसाय चालतो. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र पर्यटन व्यवसाय मध्ये सहभागी होत आहे. या धावत्या जगात पर्यटकांना हंगाम पाहावा असे वाटत नाही. त्यामुळे सर्व हंगामात पर्यटन चा विकास झालेला दिसून येतो.

**७.पर्यटनाच्या स्वरूपानुसार पर्यटनाचे प्रकार** (Classification on the basis of Nature of Tourism.)

पर्यटनाच्या स्वरूपानुसार पर्यटनाचे खालील प्रकार पडतात

**I.भौगोलिक पर्यटन** (Geographical Tourism)

भौगोलिक पर्यटनाला पर्यटक जास्त पसंती देतात. कारण भौगोलिक घटक पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत जसे की समुद्रकिनारे, धबधबे, अभयारण्य, जंगले, पर्वत, थंड हवेची ठिकाणे, नैसर्गिक आविष्कार पाहण्यासाठी या पर्यटन ठिकाणी पर्यटक भरपूर गर्दी करतात.

**II.ऐतिहासिक पर्यटन** (Historical Tourism)

या पर्यटनाचे स्वरूप ऐतिहासिक ठिकाणांना भेटी देण्याच्या उद्देशाने केले जाते. उदा. गड,किल्ले, स्मारके, राजवाडे, पुराण वस्तू इत्यादी चा इतिहास अभ्यासकाच्या दृष्टीने ऐतिहासिक पर्यटन केले जाते.

**III.सामाजिक पर्यटन** (Social Tourism)

सामाजिक पर्यटन हे शक्यतो समाजातील कमी उत्पन्न गटातील लोकांचे पर्यटन असून त्यांची निवास, भोजन, वाहतूक व्यवस्था, उच्च उत्पन्न गटापेक्षा भिन्न असते. सामाजिक पर्यटनाची खालील वैशिष्ट्य आहेत. सामाजिक पर्यटनातील सहभागी पर्यटक हे शक्यतो कमी उत्पन्न गटातील असतात. सामाजिक पर्यटन हे विविध संघटना किंवा प्रशासन त्यांच्याकडून सवलतीमध्ये केले जाते. सामाजिक पर्यटनात पर्यटक त्यांच्या नेहमीच्या निवास क्षेत्राबाहेर प्रवासास जातात.

**IV.सांस्कृतिक पर्यटन** (Cultural Tourism)

सांस्कृतिक पर्यटनामुळे देशा देशाच्या संस्कृती, इतिहास, शिल्प, प्रथा, परंपरा, रूढी, आचार-विचार, सण, उत्सव इत्यादी बाबत माहिती मिळते म्हणून जगभरातील लाखो पर्यटक ज्या पर्यटन स्थळाला सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे अशा ठिकाणी भेटी देतात.

**३.२ पर्यटनातील अधूनिक कल** (Recent Trends in Tourism)

विकसित, अविकसित देशामध्ये पर्यटन व्यवसाय ही विकासाची नामी संधी आहे. पर्यटन हा मानवाचा एक आर्थिक व्यवसाय आहे. या व्यवसायाचा प्राचीन कालावधीपासून विकास होत आहे. पर्यटनाचा विकास करीत असताना निसर्गामध्ये हानी होणार नाही का याची काळजी घेऊन पर्यटनाचा विकास करणे गरजेचे आहे. आज पारंपारिक पर्यटन केंद्र पेक्षा आधुनिक पर्यटन केंद्राकडे पर्यटकांचा कल वाढत चालला आहे. १९ व्या शतकामध्ये पर्यटनाचा आधुनिक कल दिसून येत आहे त्यामध्ये कृषी पर्यटन, वारसा पर्यटन, निसर्ग पर्यटन, साहसी व धाडसी पर्यटन, औषधी पर्यटन, भू पर्यटन त्याची सविस्तर चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

**१.कृषी पर्यटन** (Agro Tourism)

कृषी पर्यटन म्हणजे शेतीवरील फेरफटका, आपल्या संस्कृतीची ओळख, आनंद, शहरी जीवनशैलीची उबग असलेल्या लोकांनी चार दिवस शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन राहणे व शेतकऱ्यांनी शहरी लोकांच्या सशुल्क पाहूणचार, आदरातिथ्य करणे, म्हणजे कृषी पर्यटन होय. कृषी पर्यटन हा पर्यटनाचा नवीन चेहरा आहे. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासातून महाराष्ट्राचा विकास या ब्रीद वाक्यला साजेसे कृषी पर्यटन असते. शेती व्यवसायाला जोड व्यवसायाची साथ देऊन उत्पादनात भर घालता येणारा प्रकल्प म्हणजे कृषी पर्यटन होय.

**कृषी पर्यटनाचा उगम व विकास:-**

जगातील सर्वात पहिले कृषी पर्यटन एक व्यावसायिक संकल्पना म्हणून ऑस्ट्रेलिया मध्ये सुरू झाले. **१६ मे** हा जागतिक कृषी पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासतून देशाचा महाराष्ट्राचा विकास यासाठी व शेतकऱ्यांच्या हितासाठी महाराष्ट्रात कृषी पर्यटन करणाऱ्या शेतकऱ्यांनी व कृषी पर्यटन संस्थांनी एकत्र येऊन एक महासंघ स्थापन केला आहे त्याचे नाव महाराष्ट्र स्टेट ॲग्री अँड रूरल टुरिझम को-ऑपरेटिव्ह फेडरेशन लिमिटेड (मार्ट). भारतात पहिल्यांदा साधारण १८८९ च्या दरम्यान रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील चंद्रशेखर भडसावळे आणि ठाणे जिल्ह्यात प्रभाकर सावे यांनी कोकणात कृषी पर्यटन ही संकल्पना रुजवली. यानंतर २००४ च्या सुमारास बारामतीत पांडुरंग तावरे यांच्या प्रयत्नातून कृषी पर्यटनाला सुरुवात झाली. राज्यात सध्या ३०० हून अधिक कृषी पर्यटन केंद्रे आहेत. त्यामुळे अनेक स्थानिक लोकांना रोजगार मिळालेला दिसून येतो.

**कृषी पर्यटन स्थळाचे स्थान कोठे असावे:-**

कृषी पर्यटनाचे स्थान शक्यतो प्रमुख रस्त्याजवळ, एखाद्या प्रमुख ऐतिहासिक, धार्मिक, नैसर्गिक ठिकाणाजवळ असेल तर या कृषी पर्यटनाचा खूप विकास होतो उदा.महाबळेश्वर, पन्हाळा, शिर्डी, पैठण, पंढरपूर, ज्योतिबा इत्यादी.

**कृषी पर्यटनाचा विकास होण्यासाठी खालील घटक असणे गरजेचे आहेत:-**

I.निवासाची चांगली सोय,

II.भरपूर पाणी व वनस्पती,

III. पर्यटकांना आवडेल ते जेवण,

IV. पोहोण्यासाठी विहीर, सरोवर, तलाव,

V.तलाव मध्ये मासेपालन,

VI.सर्व प्रकारचे पाळीव प्राणी (बैल, शेळी, गाय, कोंबड्या)

VII.वेगवेगळे पक्षी,

VIII. शेळीपालन, कोंबडी पालन, मासेपालन, ग्रींनहाऊस इत्यादी,

IX.ग्रामीण भागातील कपडे,

X.गुळ, ऊस, भुईमूग, इत्यादी शेतीपूरक उत्पादन,

XI. मानवनिर्मित धबधबा

XII.सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे (ग्रामीण दर्शन)

XIII. शेतीतील उत्पादन पर्यटकांना उपलब्ध करून देणे

XIV. सेंद्रिय शेतीतून पिके घेणे

वरील घटक ज्या ठिकाणी उपलब्ध असतात त्या ठिकाणी कृषी पर्यटनाचा विकास मोठ्या प्रमाणामध्ये होतो.

**कृषी पर्यटनाची वैशिष्ट्ये**

I.इतर पर्यटन ठिकाण पेक्षा स्वस्त

II.शेती व शेतकऱ्यांची जीवनशैली हा गाभा

III.कुटुंबासोबत संपूर्ण करमणूक

IV. शांतता निसर्गाशी एकरूपता

V. गर्दीची पर्यटन स्थळे व शहरी गोंगाटापासून मुक्त

**कृषी पर्यटनाचे फायदे**

I.स्थानिक व्यक्तींना रोजगार उपलब्ध होतो

II.शेतकऱ्यांना शेतीशिवाय हमखास उत्पन्नाचे दुसरे साधन निर्माण होईल

III.ग्रामीण नागरी अशी सांस्कृतिक देवाणघेवाण होईल

IV.ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावेल

V.नागरी भागातील लोकांना ग्रामीण जीवन अनुभवता येईल

VI. पर्यटक आणि शेतकरी दोघांचाही आर्थिक फायदा होईल

**कृषी पर्यटन व्यवसायातील समस्या:-**

I. कृषी पर्यटनासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधेचा अभाव (रस्ते, सुरक्षा, पाणी इत्यादी)

II.ग्रामीण भागातील लोकांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव

III.कृषी पर्यटन व्यवसायासंबधी माहितीचा अभाव

IV.कृषी पर्यटन केंद्र चालू करण्यास अपूरा भांडवल पुरवठा

**२.वारसा पर्यटन** (Heritage Tourism)

जागतिक वारसा स्थान हे ज्याला सांस्कृतिक व भौगोलिक दृष्ट्या प्रतिष्ठा व महत्त्व आहे असे युनेस्कोने मान्यता दिलेली जगातील एखादे स्थान (वस्तू, ठिकाण, उद्यान, जंगल, सरोवरे इत्यादी) असते. जगातील जागतिक वारसा स्थानाची यादी तयार करण्याची जबाबदारी जागतिक वारसा स्थान समितीवर आहे. एखादा जागतिक वारसा स्थान म्हणून घोषित केले गेल्यानंतर त्या स्थानाच्या देखभालीसाठी व संरक्षणासाठी युनेस्कोकडून अनुदान दिले जाते. सध्या जगभरातील 153 देशामध्ये एकूण 996 जागतिक वारसा स्थाने अस्तित्वात असून त्यापैकी 183 नैसर्गिक स्थळे, 725 सांस्कृतिक स्थळे व 28 मिश्र स्वरूपाची स्थळे आहेत. इटलीमध्ये सर्वाधिक 47 तर भारतामध्ये 28 जागतिक वारसा स्थाने आहेत. भारत देशामध्ये या जागतिक वारसा पर्यटन स्थळाकडे पर्यटकांची संख्या वाढताना दिसून येत आहे. भारतातील जागतिक वारसा स्थानाच्या यादीत ताजमहाल, आग्र्याचा किल्ला, फत्तेपूर सिक्री (उत्तर प्रदेश) सांची स्तूप, खजुराहो मधील प्राचीन मंदिरे, भीम बेटका पाषण आश्रय (मध्य प्रदेश) छत्रपती शिवाजी टर्मिनस, एलिफंटा केव्हज, कारापुरीची लेणी, अजिंठा लेणी,

वेरूळ लेणी, कास पठार सातारा (महाराष्ट्र) चोल राज्याची मंदि,रे महाबलीपुरम मधील मंदिरे (तामिळनाडू) हम्पी मधील मंदिरे (कर्नाटक), काझीरंगा राष्ट्रीय उद्यान, मानस राष्ट्रीय उद्यान (आसाम), केवलादेव राष्ट्रीय उद्यान (राजस्थान) कोणार्क सूर्य मंदिर कोणार्क (ओरिसा), महाबोधी मंदिर बोधगया (बिहार) भारतातील पहिले पर्वतीय रेल्वे (दार्जिलिंग रेल्वे, कालका शिमला रेल्वे), नंदादेवी राष्ट्रीय उद्यान व व्हॅली ऑफ फ्लॉवर्स राष्ट्रीय उद्यान (उत्तरांचल) कुतुब मिनार, लाल किल्ला, इंडिया गेट, लोटस टेंपल, हिमायूनची कबर (दिल्ली), सुंदरबन राष्ट्रीय उद्यान (पश्चिम बंगाल), नालंदा विद्यापीठ (बिहार) कॅपिटल इमारत संकुल (चंदिगड) इत्यादी वारसा स्थळे आहेत.

वरील सर्व वारसा पर्यटन स्थळाचा संरक्षण करून जतन करण्याचे काम भारतात केले जाते. आपण या पर्यटन स्थळाच्या भेटी दिल्यास त्याच वारसा पर्यटन असे म्हणतात. आज या वारसा पर्यटन स्थळाकडे देशी-विदेशी पर्यटकांची गर्दी झालेली दिसून येते.

**3.पर्यावरणीय किंवा निसर्ग पर्यटन** (Eco Tourism)

पारंपारिक पर्यटन केंद्रे प्रामुख्याने पर्यटकांच्या गर्दीने गजबजलेली, सर्वत्र गडबड-गोंधळ, वाहनांची प्रचंड गर्दी, अस्वच्छता, प्रदूषण इत्यादी गोष्टींनी गजबजलेली असतात. सर्वसाधारणपणे पर्यटन म्हणजे मानसिक समाधान व शांतता मिळावी हा उद्देश असतो. या गर्दीच्या पर्यटन ठिकाणी श्रीमंत पर्यटक चांगल्या सुविधांचा उपभोग घेतात परंतु मध्यम वर्गासाठी हे शक्य नाही म्हणून त्याची अपेक्षा पूर्ण करण्यासाठी अलीकडे निसर्ग पर्यटन केंद्रे विकसित होत आहेत.

निसर्ग पर्यटन म्हणजे मानवी विकासापासून व मानवी हस्तक्षेपाशिवाय निसर्गाचे दृश्य पाहणे होय. निसर्ग किंवा पर्यावरणीय पर्यटन यांचा मुख्य उद्देश निसर्ग जसा आहे तसा लोकांना पाहावा आहे. निसर्गाच्या अधीन राहून शांत ज्या ठिकाणी मानवाची चिंता कमी व मनाची शांती होण्याच्या दृष्टीने निसर्ग पर्यटनाकडे पाहिले जाते. निसर्ग पर्यटनाचा विकास होण्यासाठी सर्वात मोठी आवश्यकता असते ती वैशिष्ट्यपूर्ण निसर्गाची. हा निसर्ग कुठल्याही भागापेक्षा आगळावेगळा रोमांचक असावा लागतो. हल्ली अशा निसर्ग पर्यटन केंद्राच्या ठिकाणी आरोग्यधाम, आरोग्यवर्धक शिबिरे, निसर्ग मंडळ संस्थाची स्थापना झाली आहे. निसर्ग पर्यटन केंद्रही पर्यटकांच्या शारीरिक भुकेपेक्षा मानसिक व आत्मिक भूक भागवतात त्याची संख्याही आज वाढत आहे. उदा.महाराष्ट्रातील कोयना अभयारण्य, कोयना बॅक वॉटर, माथेरान, वरळी कांचन इत्यादी केंद्राचा उल्लेख निसर्ग पर्यटन स्थळे म्हणून करता येईल.

**निसर्ग पर्यटनाचे फायदे**

I.नैसर्गिक परिस्थितीचे रक्षण होते

II. स्थानिक लोकांना रोजगार मिळतो

III.पर्यटन ठिकाणांचा समतोल विकास होतो

IV.पर्यावरणासंबंधी समाजात जागृकता निर्माण होते

V.पर्यावरणामध्ये प्रदूषण कमी करता येते

**४.साहसी किंवा धाडशी पर्यटन** (Adventure Tourism)

आज पर्यटनाचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला आहे. पारंपारिक पर्यटन स्थळ ऐवजी तरुण पिढीचा साहसी किंवा धाडसी पर्यटनकडे कल दिसून येतो. धाडसी पर्यटनामध्ये पर्यटक हा आरोग्याच्या दृष्टिकोनातून चांगला असला पाहिजे. धाडसी पर्यटन हे संयुक्त संस्थानांमध्ये फार विकसित झालेले आहे. आज भारतात ही या पर्यटनाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे. या पर्यटनामध्ये पर्यटक हा धाडसी किंवा साहसी असणे गरजेचे आहे.

**साहसी किंवा धाडशी पर्यटनाचे प्रकार**

**१.भुस्थल आधारित धाडशी किंवा साहसी पर्यटन** (land Based Tourism)

**I.पर्वत सफर /पर्वतारोहण** (Mountaineering)

पर्वत सफर करण्यासाठी नाव नोंदणी "Adventure Tour operators Association of India and Ministry of Tourism" या ठिकाणी करावी लागते. पर्वत सफर करण्यासाठी सुरुवातीस अर्ज करावा लागतो. या सफरी मध्ये 6000 मीटरपेक्षा जास्त उंचीवरील प्रवास अपेक्षित आहे. या पर्यटनामध्ये पर्यटकांचा मानसिक आजार व फिजिकल पावर तपासून प्रवेश दिला जातो. पर्वत सफरीसाठी दारू पितात त्यांना प्रवेश दिला जात नाही.

**II.ट्रेकिंग किंवा चालणे** (Trekking)

हा एक धाडसी पर्यटनाचा भाग आहे. दिवसा व रात्री जंगलांमधून प्रवास करणे काही पर्यटकांना आवडते. काही पर्यटक तर डोंगरकडा किंवा खिंड चढून पर्वतावर जातात. या पर्यटनांमध्ये सुद्धा पर्यटकांची आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर या पर्यटनासाठी मार्गदर्शक महत्त्वाचा असतो.

एखाद्या अनोळख्या ठिकाणी पायी प्रवास करण्यासाठी मार्गदर्शक जर व्यवस्थित नसेल तर पर्यटन चांगले होऊ शकत नाही. जंगलांमधून प्रवास करताना धबधब्याच्या ठिकाणी जाताना कसे जावे हे मार्गदर्शक सांगत असतो.

जंगलांमधून ट्रेकिंग करताना एखादा प्राणी दिसला तर त्याच्या पासून कसे वाचू शकतो याचे मार्गदर्शन आपल्या कॅम्प प्रमुख देत असतो.

**२.पाण्यातील धाडसी पर्यटन** (Water Based Tourism)

**I.वाहत्या नदीतील धाडसी पर्यटन** (River Running Adventure Tourism)

हे पर्यटन करण्यासाठी पर्यटक हा किमान 18 वर्षाचा असला पाहिजे. त्याला पोहता आले पाहिजे. त्याचे मेडिकल प्रमाणपत्र असले तरच या पर्यटनामध्ये सहभागी होऊ शकतो. पाण्यामधून जल प्रवास करताना पर्यटका जवळ एक दोन दिवसाची जेवण असले पाहिजे. त्याच्याजवळ सेफ्टी जॅकेट असले पाहिजे. त्याचबरोबर एक मार्गदर्शक असावा लागतो. त्या मार्गदर्शकाला तो ज्या ठिकाणी प्रवास करणार आहे त्या नदीपात्राची माहिती असली पाहिजे. या पर्यटनामध्ये मानसिक विकृती असणारा पर्यटक प्रवास करू शकत नाही.

**II.हवेतील धाडसी पर्यटन** (Air Based Adventure Tourism)

हा एक साहसी किंवा धाडसी पर्यटनाचा भाग आहे. या पर्यटनामध्ये सर्वात जास्त थ्रिलिंग अनुभवता येते. या पर्यटनामध्ये parasailing, Paragliding and Bungee Jumping हे प्रकार येतात. हे पर्यटन निसर्गाच्या सानिध्यात असते यामध्ये समुद्र, डोंगर, पर्वत कडा, नदी या ठिकाणी हे धाडसी पर्यटन मोठ्या प्रमाणात केले जाते.

**५. शाश्वत पर्यटन** (Sustainable Tourism)

वाढत्या पर्यटक संख्येमुळे शाश्वत पर्यटन ही आधुनिक संकल्पना उदयास आलेले आहे. पर्यावरणाचे नुकसान न करता पर्यटन करणे म्हणजेच शाश्वत पर्यटन होय. भविष्यामध्ये आपल्या भावी पिढीसाठी जसे आहे तसे  पर्यावरणा राखून ठेवण्याच्या दृष्टिकोनातून शाश्वत पर्यटनाची नवीन संकल्पना उदयास आलेले आहे.

**६.औषधी पर्यटन** (Medical Tourism)

आजच्या मानवाच्या गतिमान जीवनामध्ये आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. काही रोग चांगल्या हवामानामध्ये व्यवस्थित होऊ शकतात म्हणून आज भारतामध्ये काही ठिकाणी आयुर्वेदिक हेल्थ सेंटर उभा केली जात आहेत. त्या ठिकाणी सुद्धा पर्यटनाचा विकास झालेला दिसून येतो. याच आधारे आयुर्वेदिक हेल्थ रिसॉर्ट( केरळ) पतंजली योगपीठ (वाराणसी) होमिओपॅथिक सेंटर (पंजाब) प्रेशर व ॲक्युपंचर सेंटर (भारत व चीन)

**७. नवनिर्माण/ सर्जनशील पर्यटन** (Creative tourism)

पर्यटनाबरोबर पर्यटकांच्या कलागुणांचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून क्रिएटिव्ह कल्चर विकसित करण्यात येत आहे आणि ज्या ठिकाणी असे क्रिएटिव कल्चर विकसित केले जाते अशा ठिकाणी तरुण पर्यटक पर्यटन स्थळाला भेट देण्यास सुरुवात करतात.

**८. गडद पर्यटन किंवा काळा पर्यटन** (Doom Tourism)

यामध्ये जगातील कमी ज्ञात ठिकाणे समाविष्ट आहेत जी सर्रासपणे व्यापारीकरणामुळे किंवा अदृश्य होऊ लागलेल्या आहेत उदा.ग्रेट बॅरियर रीफ. ज्वालामुखीचा प्रदेश ज्वालामुखी नंतर पर्यटन केंद्र म्हणून विकसित होतात त्याला डूम टूरिझम असे म्हणतात. उदा. माऊंट किलीमांजारो याठिकाणी ज्वालामुखी झालेला प्रदेश पाहण्यासाठी हजारो लाखो देशी-विदेशी पर्यटक भेटी देतात.

**९.वस्त्रोद्योग पर्यटन** (Textile Tourism)

कापड पर्यटन म्हणजे वस्त्रोद्योगाशी संबंधित ठिकाणांचा अनुभव घेण्यासाठी प्रवास करणाऱ्या लोकांना आणि वेगवेगळ्या कपड्यांवरील ज्ञान, प्रक्रिया, विणकाम आणि हस्तकलेच्या विणकाम आणि ग्रामीण हस्तकला यामधील तंत्रज्ञानाविषयी माहिती पुरविली जाते. जयपूर, म्हैसूर, वाराणसी, कांचीपुरम इत्यादी

**१०. भू –पर्यटन** (Geo-Tourism)

ही एक नवीन पर्यटना मधील संकल्पना आहे जिओ टुरिझम म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रदेशातील नैसर्गिक भूरूपे व त्यानी बनलेल्या भूदृश्य याकरिता केलेले पर्यटन होय. सह्याद्री पर्वतरांगेतील कासचे पठार, रायरेश्वर पठार अशी उत्तम भू पर्यटन ठिकाणे म्हणून ओळखणे, त्याचे मूल्यमापन करणे, ही कामे जिओ टुरिझम मध्ये केली जातात. भारताच्या विविध भागांमध्ये अनेक असे जिओ टुरिझम आहेत याचा शोध घेणे. जिओ टुरिझम या संकल्पनेचा मुख्य उद्देश दोन दिवसाची मौज-मजा यापेक्षा निसर्ग वाचन करता येण्याची संधी मिळवून देणे व पर्यटकांची तशी मानसिकता बदलणे हाच आमचा मुख्य उद्देश आहे.

आपल्याकडे हिमालय, सह्याद्री, समुद्र किनारी प्रदेशात  ही संकल्पना परिणाम राबवता येईल यात शंका नाही

**११. शैक्षणिक पर्यटन**

शैक्षणिक पर्यटन म्हणजे अभ्यासाच्या दृष्टीने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी केलेला प्रवास होय.यामध्ये शैक्षणिक सहली,शैक्षणिक परिषद किंवा संशोधनासाठी देशामध्ये किंवा देशाबाहेर केलेला प्रवास यांचा समावेश होतो.विद्यार्थ्यांच्या दृष्टीने या पर्यटनाला जास्त महत्त्व आहे कारण क्षेत्र अभ्यास केल्यामुळे वेगवेगळ्या संकल्पना समजण्यास मदत होते.

**१२. क्रीडा पर्यटन**

क्रीडा क्षेत्राप्रमाणेच पर्यटन सुद्धा एक समूह प्रक्रिया आहे. अर्थात या दोन्ही क्षेत्रात उत्कृष्ट मार्गदर्शक व अचूक नियोजन करणे आवश्यक आहे. जगातील मोठ्या क्रीडा स्पर्धांमध्ये ऑलिम्पिक, बर्फावरील जागतिक घसरगुंडी स्पर्धा, फुटबॉल जागतिक चषक, टेनिस स्पर्धा, हॉकी, बॉक्सिंग इत्यादी स्पर्धेच्या वेळी जगभरातील पर्यटक ज्या  ठिकाणी स्पर्धा आयोजित केलेल्या आहेत अशा ठिकाणी प्रचंड गर्दी करतात. हे येणारी क्रीडाप्रेमी त्या क्रीडा नगरीतील आसपासच्या पर्यटन स्थळाचा आस्वाद घेतात.

**१३. ग्रामीण पर्यटन**

ग्रामीण पर्यटन ग्रामीण जीवन, कला, संस्कृती आणि वारसा प्रोत्साहित करते. आज जग इतके वेगवान झालेले आहे की कुणालाही कुणासाठी वेळ देणे जमत नाही. नगरातील लोकांना ग्रामीण दर्शन मिळत नाही. ग्रामीण भागात असणाऱ्या रूढी, परंपरा, चालीरीती, आचार-विचार, जेवण पद्धती या नगरातील लोकांना माहीत नसतात म्हणून आज एकविसाव्या शतकाकडे महात्मा गांधींनी सांगितल्याप्रमाणे ग्रामीण भागाकडे चला या पद्धतीने नगरातील पर्यटक ग्रामीण भागाचे दर्शन घेण्यासाठी ग्रामीण पर्यटन स्थळांची निवड करताना दिसत आहेत.

**१४. धार्मिक पर्यटनकडे असणारा कल**

मानवाकडे सर्व सुखसुविधा आहेत परंतु समाधान नाही शांतता नाही म्हणून एक मोठा वर्ग धार्मिक पर्यटनाकडे वळलेला दिसतो. मनाला शांती मिळावी, गर्दी, गोंगाट, यापासून सुटका मिळावी म्हणून काही लोक धार्मिक पर्यटनाकडे वळू लागले आहेत.

**१५. वन्यजीव पर्यटन** (Wildlife Tourism)

वन्यजीव पर्यटन, पर्यटनाच्या वेगवान विभागांपैकी एक, वन्य जीवनाचा अनुभव घेण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी प्रवास करणे गरजेचे आहे. भारतामध्ये विविध प्रकारच्या वनस्पती आहेत त्यात

पक्षी, सस्तन प्राण्यांच्या असंख्य प्रजाती,सरपटणारे प्राणी, उभयचर प्राणी आहेत . भारत सरकारने वन्यजीव पर्यटन करण्यासाठी पर्यटकासाठी वन्यजीव पॅकेज ठेवलेले आहे. पॅकेजमध्ये जंगल सफारी, पक्षीनिरीक्षण, वन्यजीव छायाचित्रण, हत्ती सफारी, जीप सफारी, जंगल कॅम्पिंग इत्यादी सोयी पर्यटकांना उपलब्ध करून दिलेले आहेत. पर्यटकांना अभयारण्यामध्ये अशा प्रकारचे जिवंत वन्यजीव पाहता येतात म्हणून अलीकडे एकविसाव्या शतकामध्ये या पर्यटनाकडे पर्यटकांचा वाढता कल दिसून येत आहे.

---

## स्वाध्याय

**खालील प्रश्नासाठी योग्य पर्याय निवडा**

१.खालीलपैकी कोणते पर्यटन हेतू नुसार होते

अ) सुट्टीचे ब) हवाई क) उन्हाळी ड) हिवाळी

२. पर्यटनातील आधुनिक संकल्पना कोणती

अ) साहसी पर्यटन ब) ऐतिहासिक क) सामाजिक ड) शैक्षणिक

३.खालीलपैकी कोणते पर्यटन ऋतुमानानुसार होते

अ) सागरी ब) सुट्टीचे क) हवाई ड) हिवाळी

४.निसर्ग पर्यटनाला कोणत्या नावाने ओळखतात

अ) कृषी पर्यटन ब) वारसा पर्यटन क) पर्यावरणीय पर्यटन ड) साहसी पर्यटन

५.खालीलपैकी कोणते पर्यटन प्रदेशानुसार केले जाते

अ) देशांतर्गत ब) पावसाळी क) धार्मिक ड) यापैकी नाही

६.खालीलपैकी कोणते पर्यटन हेतूनुसार वर्गीकरण केले जाते

अ) हिवाळी ब) पावसाळी क) उन्हाळी ड) धार्मिक

७.पर्यावरणीय पर्यटन कशासाठी केले जाते

अ) औद्योगिक विकास ब) शैक्षणिक विकास क) निसर्ग विकास ड) सांस्कृतिक विकास

८.उरळीकांचन हे कोणत्या प्रकारचे पर्यटन केंद्र आहे

अ) आंतरराष्ट्रीय बाजारपेठ ब) धार्मिक क) आरोग्य वर्धन ड) निसर्ग पर्यटन

९.जागतिक कृषी पर्यटन दिवस कधी साजरा केला जातो

अ) 15 जून ब) 10 ऑगस्ट क) 16 मे ड) 3 जुलै

१०.शेतकऱ्यांना शेतीशिवाय हमखास उत्पन्नाचे साधन म्हणून कोणते पर्यटन विकसित झाले आहे

अ) वारसा पर्यटन ब) कृषी पर्यटन क) धार्मिक पर्यटन ड) धाडसी पर्यटन

११.जागतिक वारसा स्थानाची देखभाल व संरक्षण खर्च कोण करतो

अ) युनेस्को ब) भारत क) अमेरिका ड) संयुक्त संस्थाने

१२.जीव धोक्यात घालून कोणते पर्यटन केले जाते

अ) वारसा ब) धार्मिक क) धाडसी ड) यापैकी नाही

१३.खालीलपैकी कोणते वारसा पर्यटन स्थळ आहे

अ) कास पठार ब) नरसिंहवाडी क) पंढरपूर ड) यापैकी नाही

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा**

१.पर्यटनाचे राष्ट्रीयत्वानुसार वर्गीकरण करा

२. पर्यटनाचे हंगाम कोणते ते सांगा

३. पर्यटक संख्येच्या आधारे पर्यटनाचे वर्गीकरण करा

४.कृषी पर्यटन

५. निसर्ग पर्यटन

६.धाडसी पर्यटन

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा**

१.उद्देशानुसार व ऋतूनुसार पर्यटनाचे वर्गीकरण करा

२.कालावधीनुसार व पर्यटनाच्या स्वरूपाच्या आधारे पर्यटनाचे प्रकार स्पष्ट करा

३.पर्यटनातील आधुनिक कल स्पष्ट करा